"गोड मुलांनो - तुम्ही आता ईश्वरीय सेवेवर आहात, तुम्ही सर्वांना सुखाचा रस्ता दाखवायचा आहे, स्कॉलरशिप घेण्याचा पुरुषार्थ करायचा आहे"

प्रश्नः- तुम्हा मुलांच्या बुद्धीमध्ये जेव्हा ज्ञानाची चांगली धारणा होते तेव्हा कोणती भीती निघून जाते?

उत्तरः- भक्तीमध्ये जी भीती असते की गुरु आपल्याला शाप तर देणार नाहीत ना, ही भीती ज्ञानामध्ये आल्याने, ज्ञानाची धारणा केल्याने निघून जाते कारण ज्ञानमार्गामध्ये कोणी शाप देऊ शकत नाही. रावण शाप देतो, बाबा वारसा देतात. रिद्धी-सिद्धी शिकणारे असा त्रास देण्याचे, दुःख देण्याचे काम करतात, ज्ञानामध्ये तर तुम्ही मुले सर्वांना सुख देता.

ओम् शांती. गोड-गोड रूहानी मुलांप्रती रुहानी बाबा बसून समजावून सांगत आहेत. तुम्ही सर्वात अगोदर आत्मा आहात, हा पक्का निश्चय करायचा आहे. मुले जाणतात - आपण आत्मे इथे शरीर घेऊन पार्ट बजावण्यासाठी परमधामहून येतो. आत्माच पार्ट बजावते. मनुष्य मग समजतात शरीरच पार्ट बजावते. ही आहे मोठ्यात मोठी चूक, ज्यामुळे आत्म्याला कोणी जाणत नाहीत. या अवागमनामध्ये आपण आत्मे येतो-जातो - ही गोष्टच विसरून जातो त्यामुळे बाबांनाच येऊन आम्हाला आत्म-अभिमानी बनवावे लागते. ही गोष्ट देखील कोणीही जाणत नाहीत. बाबाच समजावून सांगतात, आत्मा कसा पार्ट बजावते. मनुष्याचे जास्तीत-जास्त ८४ जन्मांपासून कमीत-कमी १-२ जन्म असतात. आत्म्याला पुनर्जन्म तर घेत रहायचे आहेत. यावरून सिद्ध होते, जास्त जन्म घेणारा जास्त पुनर्जन्म घेतो. कमी जन्म घेणारा कमी पुनर्जन्म घेतो. जसे नाटकामध्ये कोणाचा सुरुवातीपासून शेवटपर्यंत पार्ट असतो, कोणाचा थोडा पार्ट असतो. हे कोणीही मनुष्य जाणत नाहीत. आत्मा स्वतःलाच जाणत नाही तर आपल्या पित्याला तरी कशी जाणेल? आत्म्याची गोष्ट आहे ना. पिता आहेत आत्म्यांचे. श्रीकृष्ण काही आत्म्यांचा पिता नाहीये. श्रीकृष्णाला निराकार तर म्हणणार नाही. साकारमध्येच त्याला ओळखले जाते. आत्मा तर सर्वांमध्ये आहे. प्रत्येक आत्म्यामध्ये पार्ट तर भरलेला आहे. तुमच्यामध्ये देखील या गोष्टी समजावून सांगू शकणारे नंबरवार पुरुषार्थानुसार आहेत. आता तुम्ही मुले जाणता आम्ही आत्म्यांनी ८४ जन्म कसे घेतले आहेत. असे नाही की आत्मा सो परमात्मा. नाही, बाबांनी सांगितले आहे - आम्ही आत्मे पहिल्यांदा सो देवता बनतो. आता पतित तमोप्रधान आहोत, मग सतोप्रधान पावन बनायचे आहे. बाबा येतातच तेव्हा जेव्हा सृष्टी जुनी होते. बाबा येऊन जुन्याला नवीन बनवतात. नवीन सृष्टी स्थापन करतात. नवीन दुनियेमध्ये आहेच आदि सनातन देवी-देवता धर्म. त्यांच्यासाठीच म्हणतात - अगोदर कलियुगी शूद्र धर्माचे होता. आता प्रजापिता ब्रह्माची मुखवंशावळी बनून ब्राह्मण बनला आहात. ब्राह्मण कुळामध्ये येता. ब्राह्मण कुळाचे राजघराणे नसते. ब्राह्मण कुळ काही राज्य करत नाही. यावेळी भारतामध्ये ना ब्राह्मण कुळाचे राज्य करतात ना शूद्र कुळाचे राज्य करतात, दोघांनाही राज्य नाहीये. तरी सुद्धा त्यांचे प्रजेवर प्रजेचे राज्य तर चालते. तुम्हा ब्राह्मणांचे काही राज्य नाहीये. तुम्ही स्टुडंट शिकत आहात. बाबा तुम्हालाच समजावून सांगतात, हे ८४ चे चक्र कसे फिरते. सतयुग, त्रेता... नंतर येते संगमयुग. या संगमयुगासारखी महिमा दुसऱ्या कोणत्याही युगाची नाही. हे आहे पुरुषोत्तम संगमयुग. सतयुगामधून त्रेतामध्ये येतात, तेव्हा दोन कला कमी होतात तर त्यांची महिमा काय करणार! घसरण्याची (पतन होण्याची) महिमा थोडीच केली जाते. कलियुगाला म्हटले जाते - जुनी दुनिया. आता नवीन दुनिया स्थापन होणार आहे, जिथे देवी-देवतांचे राज्य असते. ते पुरुषोत्तम होते. मग कला कमी होत-होत कनिष्ठ, शूद्र-बुद्धी बनतात. त्यांना पत्थर-बुद्धी देखील म्हटले जाते. असे पत्थर-बुद्धी बनतात की ज्यांची पूजा करतात त्यांची जीवनगाथा सुद्धा जाणत नाहीत. मुले पित्याच्या जीवनाला जाणत नसतील तर वारसा कसा मिळणार. आता तुम्ही मुले बाबांच्या जीवनाला जाणता. त्यांच्याकडून तुम्हाला वारसा मिळत आहे. बाबांची आठवण करता. 'तुम मात-पिता...' म्हणता तर जरूर बाबा आले असतील तेव्हाच तर भरभरून सुख दिले असेल ना. बाबा म्हणतात - 'मी आलो आहे, तुम्हा मुलांना भरभरून सुख देतो'. मुलांच्या बुद्धीमध्ये हे नॉलेज चांगल्या प्रकारे राहिले पाहिजे, म्हणून तुम्ही स्वदर्शन चक्रधारी बनता. तुम्हाला आता ज्ञानाचा तिसरा नेत्र मिळाला आहे. तुम्ही जाणता हम सो देवता बनत आहोत. आता शूद्रापासून ब्राह्मण बनलो आहोत. कलियुगी ब्राह्मण सुद्धा आहेत तर खरे ना. ते

ब्राह्मण लोक (कुखवंशावळी ब्राह्मण) जाणत नाहीत की आपला धर्म अथवा कुळ केव्हा स्थापन झाले, कारण ते आहेतच कलियुगी. तुम्ही आता डायरेक्ट प्रजापिता ब्रह्माची संतान बनला आहात आणि सर्वात उच्च कोटीचे आहात. बाबा बसून तुम्हाला शिकविण्याची सेवा, सांभाळ करण्याची सेवा आणि श्रृंगारण्याची सेवा करतात. तुम्ही देखील आहात - ऑन गॉडली सर्विस ओनली (फक्त ईश्वरीय सेवेवर आहात). गॉडफादर सुध्दा म्हणतात - मी आलो आहे सर्व मुलांच्या सेवेसाठी. मुलांना सुखाचा मार्ग दाखवायचा आहे. बाबा म्हणतात - 'आता घरी चला'. मनुष्य भक्ती देखील मुक्तीसाठी करतात. जरूर जीवन-बंधनामध्ये आहेत. बाबा येऊन या दुःखांमधून सोडवतात. तुम्ही मुले जाणता त्राही-त्राही करतील. हाहा:कारानंतर जयजयकार होणार आहे. आता तुमच्या बुद्धीमध्ये आहे - जेव्हा नैसर्गिक आपत्ती इत्यादी येतील तेव्हा किती हाय-हाय करतील. युरोपवासी यादव सुद्धा आहेत, बाबांनी समजावून सांगितले आहे - युरोपवासीयांना यादव म्हटले जाते. दाखवतात पोटातून मुसळ निघाले आणि मग शाप दिला. आता शाप वगैरेची तर गोष्टच नाही. हा तर ड्रामा आहे. बाबा वारसा देतात, रावण शाप देतो. हा एक खेळ बनलेला आहे, बाकी शाप देणारी तर वेगळी माणसे असतात आणि त्या शापातून मुक्त करणारे (उःशाप देणारे) सुद्धा असतात. गुरू-गोसावी इत्यादींना लोक घाबरतात की कोणता शाप न देवो. वास्तविक ज्ञान-मार्गामध्ये कोणी शाप देऊ शकत नाही. ज्ञान-मार्गामध्ये आणि भक्ती-मार्गामध्ये शापाची काही गोष्टच नाही. जे रिद्धी-सिद्धी इत्यादी शिकतात, ते शाप देतात, लोकांना खूप दुःखी करतात, पैसे सुध्दा खूप कमावतात. भक्त लोक हे काम करत नाहीत.

बाबांनी हे देखील समजावून सांगितले आहे - 'संगम' या शब्दासोबत 'पुरुषोत्तम' शब्द जरूर लिहा. 'त्रिमूर्ती' शब्द देखील जरूर लिहायचा आहे आणि 'प्रजापिता' शब्द देखील जरुरी आहे कारण 'ब्रह्मा' नाव देखील अनेकांचे आहे. 'प्रजापिता' शब्द लिहाल तर समजतील साकारमध्ये प्रजापिता आहेत. फक्त 'ब्रह्मा' शब्द लिहिल्याने सूक्ष्मवतनवाला आहे असे समजतात. ते (दुनियावाले) ब्रह्मा-विष्णू-शंकराला 'भगवान' म्हणतात. 'प्रजापिता' म्हणाल तर समजावून सांगू शकता प्रजापिता तर इथे आहेत. सूक्ष्मवतनमध्ये कसे असू शकतील. विष्णूला तर दाखवतात ब्रह्माच्या नाभीमधून निघाला. तुम्हा मुलांना देखील ज्ञान मिळाले आहे. नाभी इत्यादीची काही गोष्टच नाहीये. ब्रह्मा सो विष्णू, विष्णू सो ब्रह्मा कसे बनतात. साऱ्या चक्राचे ज्ञान तुम्ही या चित्रांवरून समजावून सांगू शकता. चित्रांशिवाय समजावून सांगण्यामध्ये मेहनत लागते. ब्रह्मा सो विष्णू, विष्णू सो ब्रह्मा बनतात. लक्ष्मी-नारायण ८४ चे चक्र फिरून मग ब्रह्मा-सरस्वती बनतात. बाबांनी अगोदरच नावे दिली आहेत, जेव्हा भट्टी बनली तेव्हा नावे दिली. आणि मग किती निघून गेले म्हणून सांगितले आहे ब्राह्मणांची माळा असत नाही कारण ब्राह्मण आहेत पुरुषार्थी. कधी वर, कधी खाली होत राहतात. ग्रहचारी बसते. बाबा तर (ब्रह्माबाबा तर) सोनार होते. मोती इत्यादींची माळा कशी बनते, अनुभवी आहेत. ब्राह्मणांची माळा शेवटी बनते. हम सो ब्राह्मण दैवी गुण धारण करून देवता बनतो. मग शिडी उतरायची आहे. नाहीतर ८४ जन्म कसे घेणार. ८४ जन्मांच्या हिशोबाने हे होऊ शकते. तुमचा अर्धा काळ पूर्ण होतो तेव्हा दुसऱ्या धर्माचे ॲड होतात. माळा बनविण्यासाठी खूप मेहनत करावी लागते. अतिशय सावधगिरीने मोत्यांना टेबलावर ठेवले जाते जेणेकरून कुठे हलू नयेत. मग सुईमध्ये ओवले जातात. नीट बसले नाहीत तर मग माळा तोडावी लागते. ही तर खूप मोठी माळा आहे; तुम्ही मुले जाणता - आपण शिकत आहोत नवीन दुनियेकरिता. बाबांनी समजावून सांगितले आहे की, स्लोगन बनवा - आपण शूद्र सो ब्राह्मण, ब्राह्मण सो देवता कसे बनतो, ते एकदा येऊन समजून घ्या. या चक्राला जाणल्याने तुम्ही चक्रवर्ती राजा बनाल. स्वर्गाचा मालक बनाल. अशी स्लोगन्स बनवून मुलांनी शिकवले पाहिजे. बाबा युक्त्या तर खूप सांगतात. खरे तर व्हॅल्यू तुमची आहे. तुम्हाला हिरो-हिरोइनचा पार्ट मिळतो. तुम्ही हिऱ्या समान बनता आणि मग ८४ चे चक्र फिरून मग कवडी समान बनता. आता जेव्हा की हिऱ्या समान जन्म मिळत आहे तर मग कवड्यांच्या मागे का लागता. असे देखील नाही की, घरदार सोडायचे आहे. बाबा तर म्हणतात - गृहस्थ व्यवहारामध्ये राहून कमलपुष्प समान पवित्र रहा आणि सृष्टीचक्राच्या नॉलेजला जाणून दैवी गुण देखील धारण करा म्हणजे तुम्ही हिऱ्या समान बनाल. खरोखर भारत ५ हजार वर्षांपूर्वी हिऱ्यासमान होता. हे आहे - एम ऑब्जेक्ट. या चित्राला (लक्ष्मी-नारायणाच्या) खूप महत्त्व दयायचे आहे. तुम्हा मुलांना प्रदर्शनीमध्ये खूप सेवा करायची आहे. विहंग मार्गाच्या सेवेशिवाय तुम्ही प्रजा कशी बनवाल? भले या ज्ञानाला ऐकतात देखील परंतु उच्चपद कोणी विरळेच प्राप्त करतात. त्यांच्यासाठीच म्हटले जाते कोटिंमध्ये कोणी. स्कॉलरशिप देखील काहीजणांना मिळते. वर्गात ४०-५० मुले असतात, त्यातून कोणी एखादाच स्कॉलरशिप घेतो, कोणी थोडासा प्लसमध्ये येतो तर त्याला देखील देतात. हे देखील असे आहे. प्लसमध्ये खूप आहेत. आठ मणी आहेत ते देखील नंबरवार आहेत ना. सर्वप्रथम ते

सिंहासनावर बसतील. मग कला कमी होत जातील, लक्ष्मी-नारायणाचे चित्र आहे - नंबर वन. त्यांची देखील डिनायस्टी चालते (घराणे चालते), परंतु चित्र लक्ष्मी-नारायणाचे दाखवले आहे. तिथे तुम्ही जाणता चित्र तर बदलत जातात. चित्र देऊन काय फायदा. नाव, देश, रूप, काळ सर्व बदलते.

गोड-गोड रुहानी मुलांना, रुहानी बाबा बसून समजावून सांगतात. कल्पापूर्वी देखील बाबांनी सांगितले होते. असे नाही, श्रीकृष्णाने गोप-गोपींना ऐकवले. श्रीकृष्णाच्या गोप-गोपी असत नाहीत. ना त्यांना ज्ञान शिकवले जाते. तो तर आहे सतयुगाचा प्रिन्स. तिथे कसा राजयोग शिकवतील किंवा पतिताला पावन बनवतील. आता तुम्ही आपल्या बाबांची आठवण करा. बाबा मग टीचर देखील आहेत. टीचरला स्टुडंट कधी विसरू शकत नाही. बाबांना मुले विसरू शकत नाहीत, गुरुला देखील विसरू शकत नाहीत. पिता तर जन्मतःच असतो, टीचर ५ वर्षानंतर भेटतो आणि मग गुरु वानप्रस्थ मध्ये मिळतो. जन्मतःच गुरु करून तर काही फायदा नाही. गुरुची गोद घेऊन सुद्धा (दत्तक जाऊन सुद्धा) दुसऱ्या दिवशी मृत्यू होतो. मग गुरु काय करणार? गातात देखील - सद्गुरु शिवाय गती नाही. 'सद्गुरुला' सोडून ते मग 'गुरु' म्हणतात. गुरु तर पुष्कळ आहेत. बाबा म्हणतात - मुलांनो, तुम्हाला कोणता देहधारी गुरु इत्यादी करण्याची गरज नाही, तुम्हाला कोणाकडूनही काही मागायचे नाही आहे. म्हटले देखील जाते - 'मांगने से मरना भला'. सर्वांना चिंता असते आपण आपले पैसे कसे ट्रान्सफर करावे. दुसऱ्या जन्माकरिता ते ईश्वर अर्थ दान-पुण्य करतात तर त्याचे रिटर्न याच जुन्या सृष्टीमध्ये अल्पकाळासाठी मिळते. इथे तुमचे ट्रान्सफर होते नवीन दुनियेमध्ये आणि २१ जन्मांकरिता. तन-मन-धन प्रभु समोर अर्पण करायचे आहे. ते तर जेव्हा येतील तेव्हा अर्पण करतील ना. प्रभूला कोणी जाणतच नाहीत तर मग गुरुला पकडतात. धन इत्यादी गुरु चरणी अर्पण करतात. वारसदार होत नाही तेव्हा सर्व गुरूला देतात. आजकाल कायद्यानुसार ईश्वर अर्थ देखील कोणी देत नाहीत. बाबा समजावून सांगतात - 'मी गरीब निवाज आहे म्हणून मी येतोच मुळी भारतामध्ये. येऊन तुम्हाला विश्वाचा मालक बनवतो'. डायरेक्ट आणि इन डायरेक्ट किती फरक आहे. ते जाणत काहीच नाहीत. फक्त म्हणतात - आम्ही ईश्वर अर्पण करतो. आहे सर्व अज्ञान. तुम्हा मुलांना आता समज (ज्ञान) मिळते तर तुम्ही अज्ञानी पासून ज्ञानी बनला आहात. बुद्धीमध्ये ज्ञान आहे - बाबा तर कमाल करतात. जरूर बेहदच्या बाबांकडून बेहदचा वारसा मिळाला पाहिजे. बाबांकडून तुम्ही वारसा घेता केवळ दादांद्वारे. दादा देखील त्यांच्याकडून वारसा घेत आहेत. वारसा देणारे एकच आहेत. त्यांचीच आठवण करायची आहे. बाबा म्हणतात - मुलांनो, मी यांच्या अनेक जन्मांच्या अंतामध्ये येतो, यांच्यामध्ये प्रवेश करून यांना देखील पावन बनवतो जे मग असे फरिश्ता बनतात. बॅजवर तुम्ही खूप सेवा करू शकता. तुमचे हे सर्व बॅजेस आहेत अर्थ सहित. ही तर जीवदान देणारी चित्रे आहेत. त्यांच्या मुल्याविषयी कोणालाच ठाऊक नाही आहे आणि बाबांना नेहमी मोठी चीज आवडते, जी कोणीही दुरूनही वाचू शकेल. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) बाबांकडून बेहदचा वारसा घेण्यासाठी आपले तन-मन-धन डायरेक्ट ईश्वराला अर्पण करण्यातच शहाणे बनायचे आहे. आपले सर्व काही २१ जन्मांकरिता ट्रान्सफर करायचे आहे.

२) जशी बाबा आम्हाला शिकविण्याची, सांभाळ करण्याची आणि शृंगार करण्याची सेवा करतात, तशी बाबांप्रमाणे सेवा करायची आहे. सर्वांना जीवन-बंधनातून बाहेर काढून जीवन-मुक्तीमध्ये घेऊन जायचे आहे.

वरदान:- ज्ञान-कलश धारण करून तहानलेल्यांची तहान शमविणारे अमृत कलशधारी भव

आता बहुसंख्य आत्मे प्रकृतीच्या अल्पकालीन साधनांकडून, आत्मिक शांती प्राप्त करण्यासाठी बनलेल्या अल्पज्ञ स्थानांमधून, परमात्म भेटीचा आनंद करून देणाऱ्या ठेकेदारांपासून थकले आहेत, निराश झाले आहेत, समजतात की सत्य काही वेगळे आहे, प्राप्तीसाठी तहानलेले आहेत. अशा तहानलेल्या आत्म्यांना आत्मिक परिचय, परमात्म परिचयाचा यथार्थ थेंब सुद्धा आत्म्याला तृप्त बनवेल, म्हणून ज्ञान कलश धारण करून तहानलेल्यांची तहान भागवा. अमृत कलश सतत सोबत पाहिजे. अमर बना, आणि अमर बनवा.

बोधवाक्य:- जुळवून घेण्याच्या कलेला लक्ष्य बनवा तर सहज संपूर्ण बनाल.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा. अशरीरी बनण्याकरिता समेटण्याची शक्ती अतिशय गरजेची आहे. आपल्या देह-अभिमानाच्या संकल्पाला, देहाच्या दुनियेतील परिस्थितींच्या संकल्पाला समेटायचे आहे. घरी जाण्याच्या संकल्पाशिवाय इतर कोणत्याही संकल्पाचा विस्तार नसावा - बस्स, केवळ हाच संकल्प असावा की आता आपल्या घरी गेलो की गेलो. अनुभव करा की, मी आत्मा या आकाश तत्त्वाच्याही पार पलीकडे उडत चालले आहे, याच्यासाठी आत्तापासूनच अकाल तख्तनशीन होण्याचा अभ्यास वाढवा.